जा.क्र.नांवाशमनपा/नसका/CR-67/२०१४
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक:-२४.६.२०१४

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.**
**सर्वसाधारण सभेची पुरवणी विषय पत्रिका**

**विषय क्र.१:-**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत JNNURM अंतर्गत रस्ता क्र. २८, २८ अ या डांबरी रस्त्याचा विकास करण्याचे प्रस्तावित असून सदर कामाची मुळ प्रकल्प मंजुर (DPR नुसार) किंमत रू. ८,६५,०८,२८३/- एवढी असनु ती जिल्हा दरसुची २००५-०६ वर आधारीत आहे. सदर कामा अंतर्गत जिल्हा दरसुची मधील तफावतीमुळे (DSR Difference) सदर कामाची किंमत रू. ९,९२,३७,४६७/- एवढी आहे. सदरील रस्त्याचे काम इतर रस्त्याचे कामासोबत काही प्रमाणात करण्यात आलेले असून उर्वरित रस्त्याचे काम अतिक्रमण व भूसंपादन प्रक्रियेमुळे उद्याप पावेतो हाती घेण्यात आले नाही. त्यामुळे उर्वरीत रस्त्याचे काम हाती घेण्यासाठी जिल्हा दरसुची २०१२-१३ अन्वये सुधारीत अंदाजपत्रक तयार केले असून सदर उर्वरीत रस्त्यांची कामाची किंमत रू. ३,१९,५२,६४३/- एवढी होत आहे. रस्ता क्र. २८ या रस्त्यावरील मालमत्ता रस्ता रूंदीकरणासाठी ताब्यात घेण्यात आल्या असुन सदर ठिकाणी पुनश्च अतिक्रमण होण्याची शक्यता असल्यामुळे व रस्त्यालगत अस्तित्वातील नाली कमी रूंदीची असल्यामुळे सदर नालीतून पाण्याचा योग्य निचारा होत नसल्यामुळे तसेच सदर कामाच्या नव्याने निविदा मागविण्यासाठी व कामाचे आदेश देण्यासाठी साधारणतः दोन महिण्याचा कालावधी लागण्याची शक्यता असल्याने यासर्व अडचणी टाळण्यासाठी कामाची तातडी लक्षात घेता मनपाच्या हितासाठी मा. स्थायी समिती मान्यता घेऊन नालीचे काम तातडीने करण्यासाठी मे. एस कुमार कन्स्ट्रक्शन ठाणे हे कंत्राटदार सदर काम अंदाजपत्रक दराने करण्यासाठी संमत असल्यामुळे रू. १,३३,२६,३४४/- एवढया किंमतीचे काम त्यांना देण्यात आले. नालीची किंमत वजा जाता रस्ता क्र. २८,२८ अ च्या रस्त्याची किंमत रू.१,८६,२६,२९९/- होत आहे. करिता रस्ता क्र. २८ २८ अ या कामाची DSR २०१२-१३ नुसार होणारी अंदाजपत्रकीय किंमत रू. १,८६,२६,२९९/- यास सुधारीत प्रशासकीय व आर्थिक मंजुरीस्तव सादर.

**विषय क्र.२:-**

नांदेड शहरात काळी पिवळी टॅक्सी व ॲटोरिक्षासाठी थांबे निश्चीत करण्यासाठी मा.जिल्हाधिकारी नांदेड यांचे आदेशान्वये उपविभागीय अधिकारी नांदेड, तहसिलदार नांदेड, पोलीस निरीक्षक, शहर वाहतुक शाखा नांदेड मालमत्ता व्यवस्थापक, मनपा नांदेड, पोलीस निरीक्षक, इतवारा पोलीस स्टेशन, नांदेड, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी नांदेड, उपअभियंता यांत्रिकी, मनपा नांदेड व विभाग नियंत्रण, महाराष्ट्र राज्य मा.परीवहन मंडळ नांदेड, यांची समिती गठीत करुन दि.१०.०७.२०१३ रोजी समितीचे सर्व सदस्यांसह तसेच ॲटोरिक्षा चालक व काही पिवळी चालक मालक संघटनेचे प्रतिनीधीसह शहराच्या विविध भागामध्ये स्थळ पहाणी करण्यात आली. या दरम्याण शहरातील वाहतुक व्यवस्थेच्या अनुषंगाने विविध बाबी तपासण्यात आल्या. तसेच विविध थांबे निश्चीत करण्यासाठी स्थळ पहाणी छायाचित्रण करण्यात आली.

**१) काळी-पिवळी टॅक्सी चालक संघटनेच्या मागण्यानुसार त्यांनी एकुण पाच ठिकाणांपैकी एक ठिकाणी काळी-पिवळी थांबा देण्याची मागणी केली ती पाच ठिकाणे खालील प्रमाणे आहेत.**

| अ.क्र | ठिकाण | शेरा |
|---|---|---|
| १ | बसस्टॅन्ड समोर डॉक्टर लेन मध्ये मनाठकर यांच्या रुग्नलया समोरील महानगरपालिकेच्या मालकीची मोकळी जागा | सदर जागा डॉक्टर लेन मधील असुन बसस्टॅन्डच्या २०० मी. परिघामध्ये येत असल्यामुळे सदर ठिकाणी काळी-पिवळी चालकासाठी थांबा देता येणार नाही. |
| २ | बसस्टॅन्ड समोर लेनमध्ये असलेली खुली जागा | |
| ३ | डॉक्टर लेनमध्ये असलेली घमोडीया फॅक्टरी जवळील खुली जागा | |
| ४ | हिंगोलीगेट पुलाच्या खालील उत्तर बाजु (रेल्वेरुळा जवळ) | सदर जागा रहेमत अली खान यांना वाहनतळासाठी रु.१०२०००/- ने मार्च २०१४ पर्यंत वाहनतळ चालविण्यास दिले होते. |
| ५ | हिंगोली गेट उड्डाणपुलाखालील दक्षिण बाजु | नादेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्व साधारण सभेने दि.१८.०८.२००९ रोजी संमत केलेला ठराव क्र.६१ अन्वये सदरील जागा ही भाजीपाला व फुल विक्रेते तसेच वाहनतळासाठी राखुन ठेवलेली आहे. ती रद्द करण्याचा निर्णय घेवुन नियमानुसार जागा ही भाजीपाला व फुल विक्रेते तसेच वाहनतळासाठी राखुन ठेवलेली आहे. जागा द्यावयाचे असल्यास नियमानुसार जागा भाडेपट्यावर देण्यासाठी अभीकर्ता नेमावा लागेल. |

करीता काळी-पिवळी टॅक्सी चालक यांना काळी-पिवळी टॅक्सी थांब्यासाठी तसेच दुचाकी वाहनतळा करीता सदरील फुल विक्रेते तसेच वाहनतळासाठी राखीव ठेवण्यात आलेली जागा द्यावयाचे असल्यास नियमानुसार जागा भाडेपट्यावर देण्यासाठी अभिव्यक्ता नेमुन देण्यासाठी महानगरपालिका सर्व साधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**तसेच २) ॲटोरिक्षा चालक मालक संघटनेने एकुण आठ ठिकाणी थांबे मागणी केली ती ठिकाणे खालील प्रमाणे आहेत.**

I) पोलीस अधिक्षक कार्यालया समोरील कंपाउंड लगत

II) बसस्टॅन्ड समोरील बाजु --> सदर जागा मध्यवर्ती बसस्टॅन्ड समोरील असुन उत्तर बाजुकडील आहे. सदर ठिकाणी महानगरपालिकेने वाहनतळ व हॉटेल साठी श्री स.हाजी अली खुर्शीद अली यांना रु.७७७०००/- प्रमाणे दि.३१ मार्च २०१४ पर्यंत भाडेपट्यावर देण्यात आलेली आहे.

III) विवेकानंद बाल रुग्णालया समोर

IV) रेल्वे स्टेशन समोर कंपाउंड लगत

V) टिपु सुलतान रोड बरकत कॉम्प्लेक्सच्या चौकात

VI) देगलुर नाका चौकामध्ये अस्तित्वात असलेल्या थांब्या व्यतिरिक्त नविन तीन थांबे

VII) इदगाह कमानीच्या समोर (टायर बोर्ड)

VIII) महंमदीया चौक वाजेगाव रोड

करीता ॲटोरिक्षा चालक मालक संघटनेला ॲटो थांब्यासाठी सदरील जागा द्यावयाचे असल्यास मार्च २०१४ नंतर संबधीत ॲटोरिक्षा चालक मालक संघटनेच्या निवेदना नुसार ॲटो पार्कीग व दुचाकी वाहनतळ आणी हॉटेल असे तीन भागात विभागुन नियमानुसार जागा भाडेपट्यावर देण्यासाठी अभिव्यक्ता नेमुन देण्यासाठी महानगरपालिका सर्व साधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

वरील प्रमाणे दोन्ही संघटनांना निवेदनानुसार पार्कीग करीता जागा देण्यासाठी सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**विषय क्र.३:-**

तत्कालीन प्रशासक नगरपालिका नांदेड यांनी संमत केलेला ठराव क्र.१६५१ दि.२४.०२.१९८४ अन्वये राजस्थानी विद्यार्थी गृह नांदेड संचलित नेहरू इंग्लिश स्कुल यांना नांदेड शहर विकास आराखडयातील मौजे असदुल्लाबाद सर्वे नं.३८ मधील स्थानक क्र.४३ ची जागा प्राथमिक शाळेसाठी आरक्षीत असलेली जीचे क्षेत्रफळ १ हेक्टर आहे. तत्कालीन नांदेड नगरपालिकेने नियोजीत शाळेसाठी राखीव असलेल्या जागेवर शासनाकडुन कर्ज घेवुन रू.४८०३८.५०/- चे बांधकाम केले होते. सदर बांधकामाची रक्कम संस्ािकडुन घेवुन ती जागा शासनाच्या मान्यतेने ३० वर्षाच्या भाडेपट्टयावर नगररचनाकार जे भाडे निश्चित करतील त्या भाडयावर देण्याचे ठरविले होते. कार्यालयीन पत्र क्र.जवमा/१३५०७/८४ दि.०५.०३.८४ अन्वये संस्थेस सदर ठरावान्वये जागा ताब्यात देण्यात आली. नगरपालिकेने सदर जागेवर केलेले बांधकाम खर्च रू.४८०३८.५०/- हे दि.०५.०३.१९८४ रोजी धनादेशाद्वारे संस्थेने नगरपालिकेत भरणा केलेली आहे. संस्थेच्या ताब्यात जमीन दिल्यापासुन संस्था ही सदर जागेचा वापर शैक्षणीक वापरासाठी करीत आहे. सदरील जागा कार्यालयनी पत्रक्र.जवमा/१७२२/८४ दि.२४.०८.८४ अन्वये संस्थेस दिर्घ मुदतीच्या भाडेपट्टयावर जागा देण्यासाठी मा. जिल्हाधिकारी नांदेड यांना सदर प्रकरणी शासनाच्या मान्यतेसाठी शिफारस करणेसाठी प्रस्ताव पाठविण्यात आला होता. परंतु शासनाकडुन सदर प्रकरणात मान्यता मिळालेली नाही. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलमम ७९ नुसार दिर्घ मुदतीवर जागा भाडयाने देण्याचे अधिकार महानगरपालिकेला आहेत. सदर संस्थेस पुर्वी भाडेपट्टयावर देण्यात आलेल्या जागेच्या प्रकरणात संस्थेस चर्चेस बोलावण्यात आलेल असता मौजे असदुल्लाबाद येथील सर्वेनं.३८ मधील टिक नगर हा सोसायटीची मोकळी जागा संस्थेकडे १९८४ पासुन १ एकर जागा शाळेसाठी भाडयाने घेतली आहे. या जागेपैकी ८८०० चौ.फुट जागेत शाळेचे बांधकाम केले असुन उर्वरीत मोकळी जागा शाळेतील मुलांसाठी क्रिडांगण व तेथील रहिवाशांना शाळेच्यावेळे व्यतिरिक्त खेळ क्रिडांगणसाठी वापर करण्यात येईल. सदर जागेस संस्था स्वत:च्या खर्चाने संरक्षण भिंत बांधुन घेईल. ज्यामुळे इतर लोकांकडून अतिक्रमण होणार नाही. करीता शाळेच्या वापरात असलेली ८८०० चौफुट जागेचे लिजरंट आकारण्यात येवुन जागेची लिज ९९ वर्षाकरीता करण्याची विनंती केली. त्यानुसार सदर जागेचे भाड्याचे मुल्यांकनानुसार प्रतिवर्षी रू.९५६९/- (अक्षरी रूपये नऊ हजार पाचशे एकोणसत्तर फक्त) निश्चीत करण्यात आले आहे.

करीता सदरील निश्चीत करण्यात अलेले प्रतिवर्षी भाडे रू.९५६९/- प्रमाणे दि.०५.०३.१९८४ पासुन आकारून राजस्थानी विद्यार्थी गृह नांदेड संचलित नेहरु इंग्लीश स्कुल नांदेड या संस्थेला दिलेल्या जागेस ९९ वर्षाच्या कालावधीसाठी भाडेपट्टयावर देण्यासाठी सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**विषय क्र.४:-**

नांदेड वाघळा शहर महानगरपालिका, स्थानिक संस्था कराचे संदर्भात नांदेड शहरातील व्यापारी महासंघाच्या समन्वये समितीच बैठक दर महिन्यच्या पहिल्या सोमवारी आयुक्त महानगरपालिका नांदेड यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात येत आहे. सदर समितीच्या दि.०२.०६.२०१४ रोजी घेण्यात आलेल्या बैठकीत निर्णय झाल्यानुसार स्थानिक संस्था करासंदर्भात उद्भवणाऱ्या प्रश्नांचा व समस्यांचा निपटारा होण्याच्या दृष्टिकोनातुन व्यापारी महासंघने विनंती केल्यानुसार व्यापाऱ्यांच्या स्थानिक संस्था करासंदर्भात प्रश्नाबात बाजु मांडण्यासाठी महापालिकेचे दोन सन्माननिय सदस्य समन्वय समिती मध्ये नियुक्त करणेबाबत प्रस्ताव सादर.

**विषय क्र.५:-**

मा.आयुक्त कुटूंब कल्याण तथ अभ्यिान संचालक, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, मुंबई यांचे पत्र क्रं.NRHM/Urban RCH/२१४५८-२१५०५/२०११ दि.२४ ऑगस्ट २०११ नुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेमध्ये आर.सी.एच. फेस २ अंतग्रत

प्रोग्राम मॅनेजर या पदासाठी दि.३१.०३.२०१२ पर्यंत वेतन व भत्यावर होणारा खर्च शासनाकडून अदाई करण्यात येणार असुन त्यानंतर सदरचा खर्च महानगरपालिकेच्या निधीतून १०० टक्के करावयाचा आहे. त्याच अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेमध्ये प्रोग्राम मॅनेजर श्री सुहास रघुनाथराव सोनुले यांची नियुक्ती केली आहे. एप्रिल २०१२ पासुन सदर पदाच्या वेतन व भत्त्यावर खर्च महानगरपालिकेने करणे अपेक्षित आहे. त्यानुसार महानगरपालिका सर्वसाधारण सभेने दि.१५.०३.२०१२ रोजी संमत केलेला ठराव क्रं.१८२ द्वारे महानगरपालिका स्वतःच्या निधीतून सालसन २०१२-१३ च्या संबंधित लेख शिर्षकातून रू.१८०००/- प्रतिमहा एकत्रित वेतन व भत्ता देण्यासाठी मान्यता प्रदान करण्यात आली असुन त्यानुसार संबंधितांना महानगरपालिका निधीतून वेतन अदाई करण्यात येत आहे. महाराष्ट्र शासन आणि महानगरपालिका यांच्या संयुक्त उपक्रमातून शहरातील माताव व बालसंगोपन कार्यक्र राबविण्यासाठी व आरोग्य विषयक संपुर्ण राष्ट्रीय कार्यक्रम राबविण्यासाठी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेमध्ये प्रोग्राम मॅनेजर या पदाची नितांत आवश्यकता असल्यामुळे श्री सुहास रघुनाथराव सोनुले यांना प्रोग्राम मॅनेजर म्हणून त्यांची मुदत दि.३१.०३.२०१४ रोजी संपली असल्याने दि.०१.०४.२०१४ रोजीचा एक दिवसाचा तांत्रि खंड देवून रू.१८०००/- प्रतिमहा वेतन व भत्ते यावर दि.०२.०४.२०१४ ते दि.२९.०६.२०१४ पर्यंतची मुदतवाढ देण्यास तसेच यापुढे दर सहा महिण्यानंतर संबंधितांच्या सेवेची मुदत संपल्यानंतर त्यांच्या विभागप्रमुखांचा अहवाल घेवून त्यांचे काम समाधानकारक असल्यास त्यांच्या एकत्रित वेतनावरील सेवेत एका दिवसाचा तांत्रिक खंड देवून मुदतवाढ देण्यासाठी मान्यता देण्याकरिता प्रस्ताव महानगरपालिका सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**विषय क्रः-६**

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासननिर्णय क्र. विघयो-२०१३/प्र.क्र. १५६/नवि-४ मंत्रालय मुंबई ३२ दि. २५ फेब्रुवारी २०१४ अन्वये नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत दलित प्रभागातील नागरीकांना सोयी सुविधा पुरविणे सुलभ व्हावे म्हणुन सदर योजने खाली कामाची **निवड व निश्चिती करुन** अनुदान उपलब्ध करुन दिले आहे. शासन निर्णयानूसार परिशीष्ट `अ` मध्ये दर्शविलेल्या रु. ६५.०० लक्षच्या कामांसाठी कार्यान्वयीन यंत्रणा नांदेड सार्वजनिक बांधकाम विभाग नांदेड असून परिशीष्ट `ब` नूसार रु. १७७.०० लक्षाच्या कामाकरिता कार्यान्वयीन यंत्रणा मनपा नांदेड आहे.

शासन निर्णयातील मार्गदर्शक तत्त्वानुसार व शासन निर्णयातील परीशिष्ट अ नूसार दलित वस्तीतील कामे दलित वस्तीनिहाय अंदाजपत्रकीय किंमतीसह सर्वसाधारण सभेच्या माहितीस्तव सादर.

| अ.क्र. | कामाचे नांव | रक्कम रु. | कार्यान्वयीन यंत्रणा |
|---|---|---|---|
| | **परिशीष्ट `अ`** | | |
| १ | जयभिमनगर कमान ते ए. के. संभाजी मंगल कार्यालयापर्यत हॉटमिक्स रस्ता तयार करणे. | ४०.०० | साबांवि |
| २ | प्रभाग क्र. १८ जयभिमनगर | २५.०० | साबांवि |
| | श्रावस्तीनगर येथे बुध्द मंदिर व मस्जिद पासुन जब्बारखॉ सादकखॉ यांचे घरापर्यत सि.सि. रस्ता व नालीचे बांधकाम करणे. | | |
| | तेहरानगर बोर्डापासुन हनुमान मंदिरापर्यत सि.सि. रस्ता करणे. | | |
| | नागसेननगर ते सावित्रीबाई फुलेनगर सि.सि. रस्ता करणे. | | |
| | **एकुण** | **६५.००** | |
| | **परिशीष्ट `ब`** | | |
| १ | जयभिमनगर दलित वस्ती अंतर्गत रस्ते करणे. | १०.०० | मनपा |
| २ | प्रभातनगर दलित वस्ती अंतर्गत रस्ते करणे. | १०.०० | मनपा |
| ३ | नविन श्रावस्तीनगर दलित वस्ती अंतर्गत रस्ते करणे. | १०.०० | मनपा |
| ४ | खोब्रागडे नगर नं. १ दलित वस्ती अंतर्गत रस्ते करणे. | १०.०० | मनपा |
| ५ | खोब्रागडे नगर नं. २ दलित वस्ती अंतर्गत रस्ते करणे. | १०.०० | मनपा |
| ६ | कुक्कुटपालन, सांगवि दलित वस्ती पोहच रस्ता | १५.०० | मनपा |
| ७ | प्रभाग क्र.१३ चंद्रनगर दलित वस्ती अंतर्गत रस्ते करणे. | १०.०० | मनपा |
| ८ | प्रभाग क्र.१३लक्ष्मीनगर दलित वस्ती अंतर्गत रस्ते करणे. | १०.०० | मनपा |
| ९ | प्रभाग क्र.१३विठ्ठलनगर दलित वस्ती अंतर्गत रस्ते करणे. | १०.०० | मनपा |
| १० | हडको, नविन नादेड भागात एन. डी. ३१ प्रभाग क्र. ४० येथे अण्णाभाऊ साठे सांस्कृतीक सभागृहाचे बांधकाम करणे. | ५.०० | मनपा |
| ११ | प्रभाग क्र. २० भागात दत्तात्रय मंदिर ते भिमघाट सि.सि. रस्ता करणे. | ५.०० | मनपा |
| १२ | प्रभाग क्र. ३८ भिमवाडी, सिडको येथील बौध्द विहाराजवळ सभागृहाचे बांधकाम करणे. | ५.०० | मनपा |

| | | | |
|---|---|---|---|
| १३ | प्रभाग क्र. ३९ हडको येथील (इंदिरा गांधी हायस्कुलच्या शेजारी पंचशील बौध्द विहार येथे) डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक अभ्यासिकेचे बांधकाम करणे. | ५.०० | मनपा |
| १४ | प्रभाग क्र. ३९ सिडको एन. डी. ४१ दत्तनगर मध्ये सि.सि. रस्त्याचे बांधकाम करणे. | ५.०० | मनपा |
| १५ | प्रभाग क्र. ३८ वसरणी सुजाता बैध्दविहार येथील संरक्षण भिंतीचे बांधकाम करणे. | ५.०० | मनपा |
| १६ | प्रभाग क्र. ३७ कौठा विरभद्रनगर येथील सि.सि. नालीचे बांधकाम करणे. | ५.०० | मनपा |
| १७ | प्रभाग क्र. २८ जुना पोस्त ऑफिस ते जिल्हा परिषद शाळा संघसेन नगर गिरगांवचाळ सि.सि. रस्ता बांधकाम करणे. | ५.०० | मनपा |
| १८ | प्रभाग क्र. ३६ वसरणी येथे भास्करनगर मध्ये समाज मंदिराचे बांधकाम करणे. | ५.०० | मनपा |
| १९ | प्रभाग क्र. ३८ मध्ये सिडको येथील एन. डी. ३१ मधील नालंदा बौध्द विहार करिता समाज मंदिराचे बांधकाम करणे. | ५.०० | मनपा |
| २० | प्रभाग क्र. ३० चौफाळा येथील सिध्दनाथपुरी नाल्यावर सि.डी. वर्क्सचे बांधकाम करणे. | ५.०० | मनपा |
| २१ | चिखलवाडी नांदेड (प्रभाग क्र. २२) येथे वडार वस्तीमध्ये बऱ्यामसिंघ नवाब यांच्या घरापासून ते तापडीया बिल्डींग पर्यत रस्ता व नालीचे बांधकाम करणे. ५.०० | ५.०० | मनपा |
| २२ | प्रभाग क्र. १९ खडकपुरा अंतर्गत पंचशिलनगर दलित वस्तीमध्ये सि.सि. रस्ता व नालीचे बांधकाम करणे. | ५.०० | मनपा |
| २३ | प्रभाग क्र. २३ मध्ये शक्तीनगर भागात मोकळया जागेमध्ये व्यासपिठाचे बांधकाम करणे. | ५.०० | मनपा |
| २४ | प्रभाग क्र. ४० हडको नविन नांदेड येथे शाहुनगर वाघाळा दलित वस्तीमध्ये सिमेंट कॉक्रीट रस्ता व नालीचे बांधकाम करणे. | ५.०० | मनपा |
| २५ | प्रभाग क्र. २० भागात दलित वस्तीमध्ये मार्कडेय मंदिर ते भिमघाटरोड देगावचाळ गल्ली बोळातील सिमेंट कॉक्रीट रस्त्याचे बांधकाम करणे. | ७.०० | मनपा |
| | **एकुण** | **१७७.००** | |

**-: स. सदस्यांचे प्रस्ताव :-**

**विषय क्र.७:-** **<u>प्रस्ताव</u>**

मौजे लालवाडी येथे गेल्या ७० वर्षापुर्वी पासून दलित आणि मुस्लीम व ईतर ओ.बी.सी. समाजाचे गोरगरीब लोक वास्तव्य करुन राहतात त्यांना मनपाने सर्व प्रकारच्या नागरी सुविधा पुरविल्या आहेत. तेथील रहिवाशी देखील महानगरपालिकेस सर्व प्रकारचा कर भरणा नियमितपणे करीत आहेत. आता नव्याने रेल्वे विकास अंतर्गत सदरील झोपडपट्टी उठविण्याची धडक मोहिम रेल्वे विभागिय खात्याने घेतली आहे. दि.२५.०५.२०१४ रोजी डि.आर.एम.यांना निवेदन देवून एक महिण्याची मुदत घेतली आहे. पालकमंत्री श्री डि.पी.सावंत साहेब व डि.आर.एम.यांचेशी योग्य ते बोलणे केले आहे. असे असले तरी ही मोजे लालवाडी येथील रहिवाश्यांच्या डोक्यावर टांगती तलवार कायम आहे.

मौजे लालवाडी व जयभिमनगर येथील बेघर रहिवासी दलित, मुस्लीम, ओबीसी समाजाचे असून अत्यंत गरीबीत आणि हलाखीत जीवन जगत असतांना आता रेल्वेच्या कृतीने त्यांना व त्यांच्या मुलाबाळांना कायम देशोधडीला लागावे लागेल. मानवतेच्या दृष्टीने आणि गरीबांना न्याय देण्याच्या हेतून साईट क्र.३४ मध्ये या कुटुंबियाचे पुर्नवसन करणेसाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

**सुचक :-** अंजली सुरेश गायकवाड

**अनुमोदक :-** स.शेर अली महेबुब अली, बाळासाहेब गंगाधरराव देशमुख, नवल पोकर्णा, गफार खान गुलाम महमंद खान

**विषय क्र.८:-** **<u>प्रस्ताव</u>**

किल्ला रोड बुरुडगल्ली येथे गेल्या २०वर्षापासून मुस्लीम व इतर ओ.बी.सी.समजाचे गोरगरीब लोक वास्तव्य करुन राहतात. आता मनपा जेएनएनयुआरएम रस्ता क्र.६ अंतर्गत तयार करण्यासाठी किल्ला रोड बुरुडगल्ली येथील नागरीकांचे घर रोड रुंदीकरणामध्ये जाणार असून येथील सर्व नागरीक बेघर होणार आहेत. किल्ला रोड बुरुडगल्ली येथील बेघर रहिवासी मुस्लीम, ओबीसी समाजाचे असून अत्यंत गरीबीत आणि हलाखितज जीवन जगत असतांना आता जेएनएनयूआरएम रस्ता क्र.६ त्यार करण्याच्या रुंदीकरणामूळे त्याना व त्यांच्या मुलाबाळांना कायम देशोधडीला लागावे लागेल मानवतेच्या दृष्टीने आणि गरीबांना न्याय देण्याच्या हेतून तेहरानगर साईट क्र.३४ येथे या सर्व कुटुंबाचे हमालपुराच्या व इतर भागाच्या धर्तीवर पुर्नवसन करणेसाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

**सुचक :-**शेख हबीब बावजीर बु-हाणखान **अनुमोदक :-** स.शेर अली महेबूब अली, लतिफा बेगम

**विषय क्र.९:-** **प्रस्ताव**

हैदरबाग पाण्याची टाकी शाळा क्र.१२ हे पहिली ते चौथी पर्यत असून या भागातील विद्यार्थ्यांना पाचवा वर्ग नसल्यामूळे बरेच विद्यार्थी इतर शाळेत प्रवेश न घेता शाळा सोडून देत आहेत. तरी या भागातील विद्यार्थ्यांना हैदरबाग येथील शाळेत वर्ग पाचवा नैसर्गिक वाढ म्हणून जून २०१४ पासून सुरू करणेसाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

**सुचक :-**स.शेर अली महब **अनुमोदक :-** बावजीर शेख हबीब शेख अब्दुल्ला

**विषय क्र.१०:-** **प्रस्ताव**

उपसरपंचनगर येथील मोकळा भूखंड गट नं.१६३ मधील क्र.५मधील क्षेत्रफळ १५X४० फूट संपादित करुन सार्वजनिक रस्ता स्वप्नजा गार्डनच्या मुख्य रस्त्यापासून उपसरपंचनगरला जोडणार मुख्य रस्ता करून देणेबाबत. तरोडा (खु.) प्रभाग क्र.७ अंतर्गत असलेल्या उपसरपंचनगर ला स्वप्नजा गार्डनच्या मुख्य रस्त्याला जोडण्यासाठी ऐन रस्तयावर असलेला गट क्र.१६३ मधील मोकळा भूखंड क्र.५ ज्याची लांबी १२.२X११.४३ मीटर असून त्यापैकी सार्वजनिक रस्त्यासाठी १५X४० फुट क्षेत्रफळ संपादित करून सार्वजनिक रस्ता स्वप्नजा गार्डन च्या मुख्य रस्त्यापासून उपसरपंचनगरला जोडणारा मुख्य रस्ता नागरिकांची सोय होईल. स्वप्नजा गार्डन, उपसरपंचनगर, मा. बसवेश्वर नगर, भगवान नगर इ. नगरमधील रहिवाशांची संख्या ५-६ हजार एवढी असून बहुतांश रहिवाशी हे शासकिय कर्मचारी असून त्यांचे कार्यक्षेत्र सुध्दा दूर दूर आहे. सदर प्लॉट चे मालक हिरामण गोपाळराव खडसे रा. उपसंरपंचनगर येथील रहिवाशी असून त्यांना रस्ता करण्यासाठी १५X४० फूट जागा देण्याबाबत १०० रू. च्या शासकिय मुद्रांकावर साक्षीदारासमक्ष संमती दिली आहे. येथील रहिवाशी श्री गंगाधर मारोतराव गच्चे यांनी व इतर रहिवाशांनी जिल्हाचे पालकमंत्री साहेबांना दिलेल्या निवेदनावरील शेऱ्यानुसार शहर अभियंता, नांवाशमनपा, नांदेड यांनी दि.३१.०५.२०१३ जागेची पाहणी करुन अहवाल सादर केला आहे. त्याच्या अहवालानुसार १५X४० फुट क्षेत्राची रक्कम रू.३.५५ लक्ष एवढी होते. तरी १५X४० फूट जागा संपादित करुन मुख्य रस्ता करुन नागरीकांची सोय करावी हि विनंती. करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर सादर.

**सुचक-** सौ. अन्नेवार गंगासागर संदिप **अनुमोदक-** वाजेदा तब्बसुम

**विषय क्र.११:-** **प्रस्ताव**

नांदेड भुमीचे सुपुत्र शमसऊजमा खाजी यांची निवड महाराष्ट्र रणजी ट्रॉफीसाठी झाल्याने नांदेडचे नाव लौकीक करणारे शमसऊजमा खाजी यांना महापालिकेडुन रू. १० लक्षाची रोख मदत करण्यास ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मंजुरी देते व पुढील वैधानिक कार्यवाही करण्यास मंजुरी देते.

**सुचक-** अ. गफारखान गुलाम मोहमदखान **अनुमोदक-** सय्यद शेर अली, अ. हबीब बागवान,अंजु बेगम शे. अफरोज, बीपाशा बेगम

वलीओद्दीन, आसीयाबेगम अ. हबीब, हबीब बावजीर, डॉ. विश्वास बालाजीराव कदम

**प्रशासकीय टिप्पणी**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६६(२१), (२२), (२५), (२६) व (४१) नुसार तयार केलेल्या नियमावलीतील अनुदान वाटप करावयाची पध्दत कलम ३ मुद्द क्र.९ अन्वये अंशदान अथवा अनुदान मिळणे हा कोणाचाही हक्क राहणार नाही. तो महानगरपालिकेल्या उपलब्ध निधीवर अवलंबून राहील, असे स्पष्ट नमुद आहे. तसेच कार्यालयीन पत्र क्र. नांवाशमनपा/लेख विभागा/४१७८/११, दि.२६.०९.२०११ अन्वये महानगपालिकेची आर्थिक परिस्थिती पाहता विविध पंजीकृत संस्थांना देण्यात येणारे अनुदान बंद करण्यात आलेले आहे. करिता उक्त नियमावलीतील तरतुद व महानगरपालिकेचे आर्थिक परिस्थिती पाहाता श्री शमसऊजमा खाजी यांना रुपये १०.०० लक्षाची रोख मदत देता येणार नाही.

**विषय क्र.१२:-** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दितील क्र. १६(अ) मधील आंबेडकरनगर भागात मोठया प्रमाणात दलित वस्ती आहे. येथील नागरीक मोलमजुरी करून आपला उदरनिर्वाह करतात. परंतु येथील नागरिक बी.एस.यु.पी. योजनेअंतर्गत मिळणाऱ्या घरकुल योजनेपासून भयंकर त्रस्त झालेले आहेत. आंबेडकरनगर येथील घरकुलांची कामे K.Y. इन्टरप्राईजेस या कन्स्ट्रक्शनला देण्यात आली होती. परंतु गेल्या दोन-तीन वर्षापासून घरकुलांची कामे अर्धवट स्थितीत करुन सोडुन दिली आहेत.

तरी या कन्स्ट्रक्शनचे नाव Blacklist करण्यात यावे जेणेकरुन गरीब जनतेला या कन्स्ट्रक्शनच्या कामाचा त्रास होणार नाही. अर्धवट घरकुलांची कामे करण्यासाठी दुसऱ्या कन्स्ट्रक्शनची सोय करण्यात यावी आणि गोरगरीब जनतेला दिलासा देण्यात यावा हा ठराव याच सभेत मंजूर करावा.

**सुचक-** रजिया बेगम अय्युबखान **अनुमोदक-** करुणा जमदाडे,

**विषय क्र.१३:-** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील नवा मोंढा समोरील विद्यमान शासकीय गोडाऊनची जागा मनपा हद्दीत असून सदर गोडाऊन आता इतरत्र हलवियात आलेले असल्यामुळे सदर जागा आता वापरात नसल्यामुळे त्या शेजारी अण्णाभाऊ साठे व्यापारी संकुल उभा करण्याच्या दृष्टीने सदर जागा योग्य असल्यामुळे व जागा शासकीय असल्यामूळे ती शक्यतो विनामूल्य अन्यथा काही किंमत देणेअसेल तर ती देवून शासनाकडून मनपास हस्तांतरीत करुन घेवून त्याठिकाणी अद्यावत व्यापारी संकूल बांधणेकरीता हि सर्वसाधारणसभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचक-** नवल पोकर्णा **अनुमोदक-** स.विरेंद्रसिंघ गाडीवाले

**विषय क्र.१४:-** **प्रस्ताव**

धनंतय बापूराव रत्नपारखे हे जकात जवान हया पदावर कार्यरत असतांना त्यांना दि.१२.११.२०१२ रोजी जा.क्र.मनपा/अस्था-४/६८७१/२०१२ अन्वये सेवेतून कमी केले आहे. त्यांनी दि.२१.१२.२०१२ रोजी नियमानुसार एका महिण्याचे आंत मा.स्थायी समिती,सभापती यांचेकडे अपिल केले त्या सभेत त्यांचे अपिल स्थायी समितीने ठराव क्र.१५५ अन्वये दि.१८.११.२०१३ रोजी मान्य करुन दोन सामान्य वेतनवाढी कायम स्वरुपी गोठवण्यात येवून त्यांना पुर्ववत मनपाकेत सेवेत कामावर रुजू करण्यासाठी व त्यांचा निलंबन काळ हा असाधारण रजेत समाविष्ट करण्याची मान्यता देवून प्रशासनाकडे पाठविला,

करीता श्री धनंजय बापूराव रत्नपारखे .जकात जवान यांचा व त्यांच्या कुटूंबियावर होणा-या उपासमारीचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन संबंधितांना स्थायीसमितीच्या निर्णयाच्या अधिन राहून पूर्ववत पदावर घेणे करीता हि सर्वसाधारण सभा सवानुमते मान्यता देण्यात येते.

**सुचक-** सौ.सुदर्शना महेश (बाळू) खोमणे **अनुमोदक-** शेख हबीब बावजीर

**विषय क्र.१५:-** **प्रस्ताव**

गुरु-ता-गध्दी व जेएनएनयुआरएम योजने अंतर्गत शहरात रस्ते व इतर विकास कामांसाठी गुरुव्दारा साहिब बोर्डची संपादित मालमत्तेचा देय असलेला मावेजा बाबतीत चर्चा करणे.

**सुचक-** विरेंद्रसिंध गाडीवाले **अनुमोदक-** सरजितसिंघ गिल

**विषय क्र.१६:-** **प्रस्ताव**

गुरुव्दारा लंगर साहिब यांना ग्रीनसिटी अंतर्गत मनपातर्फे प्रलंबित आर्थिक मदत देणे बाबत चर्चा करणे.

**सुचक-** विरेंद्रसिंध गाडीवाले **अनुमोदक-** सरजितसिंघ गिल

**विषय क्र.१७:-** **प्रस्ताव**

शहरातील अनाधिकृत बांधकाम नियमित करण्याबाबत हार्डशिप ,गुंठेवारी चे दर विशेष मोहिमे अतर्गत विशेष सवलत काही काळ मर्यादेपर्यत देूवन महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविणे व बांधकामे नियमित करणे बाबत चर्चा करुन निर्णय घेणे बाबत.

**सुचक-**विरेंद्रसिंध गाडीवाले **अनुमोदक-** नवल पोकर्ण

**विषय क्र.१८:-** **प्रस्ताव**

देगलूर नाका इदगाह कमानी जवळ जेएनएनयूआएम योजने अंतर्गत ड्रेनेज लाईनचे काम करतांना मृत्यू झालेल्या मजुरांच्या कुटुंबाला आर्थिक मदत देण् बाबत.

**सुचक-** शफि अहेमद कुरेशी **अनुमोदक-** अ.फसीया फिरदोस

**विषय क्र.१९** **प्रस्ताव**

राधाकृष्ण अग्रवाल मार्केट मधील श्री शुक्ला यांनी पोटभाडेकरु म्हणून ठेवल्यामूळे कार्यवाही करुन महानगरपालिकेने दुकानाची भाडेपटी रध्द केल्यानंतर पुन्हा कोणत्या नियमानुसार त्यांना प्रशासकीय प्रक्रिया न करता पुन्हा त्यांना दुकान बहाल करण्यात आली याबाबत चर्चा करुन कार्यवाही करणे बाबत.

**सुचक -**आनंद शंकरराव चव्हाण **अनुमोदक-** शफि अहेमद कुरेशी

**विषय क्र.२०:-** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेमध्ये नोव्हें.२०१२ ते डिसेबर २०१३ याकालावधीमध्ये आजपावेतो किती अप्रशासकीय ठराव मंजुर करण्यात आलेले आहे व एकुण मंजुर ठरावापैकी किती ठरावाची पुर्णपणे अमलबजावणी झाली व किती ठरावाची अमलबजावणी होणे बाकी आहे.याची सविस्तर माहिती सर्वसाधारण सभे समोर सादर करण्यात यावी.

**सुचक -** शफि अहेमद कुरेशी **अनुमोदक-** आनंद शंकरराव चव्हाण

**विषय क्र.२१:-** **प्रस्ताव**

गोकुळनगर ते रस्ता क्र.२६ पर्यत सर्व सुविधासह सिमेट रस्ता नगरोत्थान किंवा जेएनएनयुआरएम मधून करण्यास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे बाबत.यारस्त्यावर रेल्वे स्टेशन,स्टेडियम ,शुक्रवार बाजार व इतर महत्वाचे ठिकाणे आहे त्यामूळे हा रस्ता अत्यावश्यक आहे

**सुचक -** कमलाबाई रामस्वामी मुदीराज **अनुमोदक-** विजय हिरांचद येवनकर

स्वाक्षरीत/-
**नगरसचिव,**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका.नांदेड

स्वाक्षरीत/-
**महापौर,**
नांदेड वाघाळा शहरमहानगरपालिका, नांदेड.